दूरध्वनी : ८१९ २५५१
८१९ २८२८
८१९ १५००
८१९ २००५

# मिरा भाईंदर नगरपालिका परिषद

मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, ता. जि. ठाणे-४०१ १०१.

जा.क्र. नपा/नर/ ४५२० / ३५ /८५-८६ दिनांक ३/७/८५

प्रति,

श्री. मे. दिशा डिझाईन कन्स्ट्रक्शन्स
सी-१५, वृन्दावन नं. ३, यशोधाम
गोरेगाव (पूर्व) मुंबई-४०००६३.

विषय :-मिरा भाईंदर येथील सर्व्हे नं./ सिटी सर्व्हे नं. ९८८ हि.नं. २९ पै
मौजे भाईंदर चे नियोजित बांधकामांच्या नकाशांना प्राथमिक मंजुरी मिळणे बाबत.

संदर्भ :- १) आपला दि. ९६/३/८५ चा अर्ज.
२) मे. सक्षम प्राधिकारी, नागरी संकुलन ठाणे यांचे कडील आदेश क्र. यु.एल.सी./टी.ए./ —
एस.आर. — दि. — ची मंजुरी.
३)

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६च्या कलम ४५/६९ अन्वये व महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम ६५ च्या कलम १८९ अन्वये विकास कार्य करण्यासाठी, परवानगी मिळण्यासाठी आपण विनंती केले नुसार मिरा भाईंदर येथील मौजे भाईंदर स.नं./हि.नं. ९८८ हि.नं. २९ पै नकाशांना हिरव्या रंगाने दुरुस्त्या दर्शविल्याप्रमाणे खालील अटीस अधिन राहून प्राथमिक अकृषिक वापराकरीता मंजुरी देणेत येत आहे.

१) सदरची मंजुरी अंतिम नाही. ती तात्पुरत्या स्वरुपाची आहे.

२) सदर भुखंडाचा वापर फक्त रहिवासासाठीच करणेचा आहे.

३) मंजुरी नकाशाप्रमाणे जागेवर प्रत्यक्ष मोजणी करुन घेणेची आहे व त्यांची जिल्हा निरिक्षक भूमी अभिलेख ठाणे यांना प्रमाणित केलेली नकाशाची प्रत या कार्यालयाच्या अभिलेखार्थ दोन प्रतीमध्ये पाठविणेची आहे व त्यास मंजुरी घेणे आवश्यक आहे.

४) सदर भूखंडाची उपविभागणी इकडील पूर्वपरवानगीशिवाय करणेची नाही.

५) या जागेत आजुबाजुला जे पूर्वीचे नकाशे मंजुर झाले आहेत, त्याचे रस्ते हे सदर नकाशातील रस्त्यांशी प्रत्यक्ष मोजणीचे व सिमांकनाचे वेळी सुसंगत जुळणे आवश्यक आहे.

६) मे. जिल्हाधिकारी सो., ठाणे यांचेकडील अकृषिक परवानगी घेऊन त्यानंतर नगरपालिकेची बांधकाम परवानगी घेतल्याशिवाय जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम चालू करु नये.

७) नागरी जमीन परिमर्यादा १९७६ चे कायद्यामधील तरतुदींना कोणत्याही प्रकारे बाधा येता कामा नये.

८) जेव्हा आजुबाजुच्या जमिनीतील नकाशे मंजुर होतील त्यावेळी सदर नकाशातील संलग्नीत रस्ते सर्वांसाठी खुले ठेवणे आवश्यक आहे.

९) मालकी हक्काबाबतचा वाद उद्भवल्यास त्यास अर्जदार जबाबदार राहील. तसेच वरील जागेचा मार्ग